CNR-MHBU11-000801-2022

| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | : | १९/०९/२०२२ |
| नोंदणी दिनांक | : | १९/०९/२०२२ |
| निकाल दिनांक | : | ०१/०४/२०२६ |
| कालावधी | : | वर्ष महिना दिवस<br>०३ ०६ १३ |

**मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, मलकापूर, जिल्हा बुलढाणा यांच्या न्यायालयात**
**(सदस्य :– पुरुषोत्तम भा. जाधव.)**

**मोटार अपघात दावा क्र. ५७/२०२२** **निशाणी क्र. ४६**

१) **अनुराधा अमोल बोंडे,**
वय अंदाजे २७ वर्ष, व्यवसाय – काही नाही,

२) **मार्तंड अमोल बोंडे,**
वय अंदाजे २ महिने, अज्ञान,

३) **कु. स्वरा अमोल बोंडे,**
वय अंदाजे ८ वर्ष, व्यवसाय – शिक्षण,

४) **कु. रागिनी अमोल बोंडे,**
वय अंदाजे ४ वर्ष, व्यवसाय – शिक्षण,

क्र. २ ते ४ तर्फे अज्ञान पालनकर्ता आई अर्जदार क्र. १.

५) **सौ. कल्पना प्रकाश बोंडे,**
वय – ५० वर्ष, व्यवसाय – काही नाही,

६) **प्रकाश रामलाल बोंडे,**
वय – ५५ वर्ष, व्यवसाय – काही नाही,

सर्व राहणार विटाळी (धा), तालुका नांदुरा, जिल्हा बुलढाणा.

**... अर्जदार/ दावेदार.**

**सदस्य मो.अ. दावा न्या.**

–विरुध्द–

| | | |
|---|---|---|
| १) **जितेंद्र सुरेश पाटील,**<br>वय – अंदाजे ३१ वर्ष, व्यवसाय – नोकरी,<br>राहणार सिसोदे, तालुका पारोळा, जिल्हा जळगांव.<br><br>२) **महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,**<br>विभागीय कार्यालय, बुलढाणा,<br>तालुका जिल्हा बुलढाणा. | } | **... सामनेवाला.** |

– – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – –

| | | |
|---|---|---|
| **अर्जदारांतर्फे विधीज्ञ** | :– | **श्री. के.व्ही. परमार.** |
| **सामनेवाला क्र. १ तर्फे विधीज्ञ** | :– | **एकतर्फा.** |
| **सामनेवाला क्र. २ तर्फे विधीज्ञ** | :– | **श्री. एन.एच. पाचपोर.** |

– – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – –

## न्यायनिर्णय

**(पारीत दिनांक – ०१ एप्रिल, २०२६)**

मयत अमोल प्रकाश बोंडे यांची पत्नी, मुले आणि आई–वडील यांनी मोटार वाहन अधिनियम कलम १६६ अन्वये मोटार अपघात नुकसान भरपाई मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज केला आहे.

**अर्जदारांचे प्रकरण थोडक्यात येणेप्रमाणे –**

२) तारीख २७/०६/२०२२ रोजी मयत अमोल हा त्याची

मोटरसायकल क्र. एमएच २८ – डब्ल्यू २९०८ ने नांदुरा येथून विटाळी येथे येत असताना रात्री ८:३० ते ९:०० वाजेच्या सुमारास नायगाव फाटा ते गुरुद्वाराच्या रस्त्यावर पोहोचला असता मलकापूरकडून येणारे एसटी बस क्र. एमएच ४० – एन ९६४७ चा चालक म्हणजेच सामनेवाला क्र. १ याने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे, रस्त्याच्या परिस्थितीचा विचार न करता चालवून मयत अमोल बोंडे यांचे मोटरसायकलला धडक दिली. त्यामुळे मयत अमोल हा गंभीर जखमी झाला. त्याला उपजिल्हा सामान्य रुग्णालय मलकापूर येथे भरती करण्यात आले, मात्र त्यास वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मृत घोषित केले. सदर अपघाताबाबत दिनेश तुकाराम बोंडे यांच्या फिर्यादीवरून पोलीस स्टेशन, नांदुरा येथे सामनेवाला क्र. १ विरुद्ध भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम २७९, ३०४–अ आणि मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम १३४ नुसार अपराध क्र. ४०३/२०२२ दाखल करण्यात आला. सामनेवाला क्र. २ सदर एसटी बसचे मालक असल्याने ते नुकसान भरपाई देण्यास जबाबदार असल्याचे अर्जदारांचे म्हणणे आहे.

३) अर्जदारांचे प्रकरण पुढे असेही की, अपघातावेळी मयत अमोल यांचे वय ३२ वर्षे होते. ते रस्ता कंत्राटदार म्हणून काम करत होते. त्यांना दरमहा रुपये पंचेचाळीस हजार उत्पन्न मिळत होते. त्यांच्याकडे सव्वा तीन एकर शेत जमीन होती आणि त्यापासून त्यांना वार्षिक रुपये दोन लाख उत्पन्न मिळत होते. त्यांच्यावर सर्व अर्जदार अवलंबून होते. या परिस्थितीत अर्जदारांनी मोटार अपघात नुकसान भरपाई म्हणून रक्कम रुपये २५,००,०००/– मागणी केलेली आहे.

४) सामनेवाला क्र. १ यांच्यावर निशाणी क्र. ८ प्रमाणे अर्जाची नोटीसीची बजावणी होऊ देखील ते न्यायालयात हजर झाले नाही, म्हणून त्यांच्याविरुद्ध सदर प्रकरण एकतर्फा चालवण्याचा हुकूम तारीख २१/१२/२०२३ रोजी निशाणी क्र. १ खाली करण्यात आला.

५) सामनेवाला क्र. २ यांनी निशाणी क्र. १२ वर आपला लेखी जबाब दाखल करून अर्जास सक्त विरोध केला आहे. त्यांनी अर्जातील संपूर्ण मजकूर नाकारलेला आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, तारीख २७/०६/२०२२ रोजी एसटी बस ठाणे येथून शेगावकडे जात असताना नायगाव फाटा येथे आली, त्यावेळी रात्रीचे वेळ होती, समोरून एक ट्रक येत होता, त्या ट्रकने मोटरसायकलला धडक दिली, त्यामुळे मोटरसायकल घसरत जाऊन एसटी बसला धडकली, त्यावेळी एसटी बस चालकाने बस थांबून पाहणी केली असता त्यांना मोटर सायकल चालक दिसला नाही, त्यामुळे एसटी बस चालकाने बस पुढील प्रवासास नेली. या परिस्थितीत सदरचा अपघात बस व मोटरसायकल यांच्यात झालेला नसून सदरचा अपघात मोटरसायकल आणि ट्रक यांच्यात झालेला आहे. मोटर सायकलचे विमा कंपनीस या कामी पक्षकार न केल्यामुळे सदरचा अर्ज आवश्यक पक्षकार न केल्याच्या कारणामुळे चालू शकत नाही.

६) सामनेवाला क्र. २ यांचे असेही म्हणणे आहे की, मयत अमोल यांच्याकडे मोटार वाहन चालवण्याचा वैध परवाना नव्हता. त्याचप्रमाणे ते भरधाव वेगाने निष्काळजीपणाने कोणतीही काळजी न घेता वाहतूक नियम न पाळता

मोटरसायकल चालवत होते, त्याचप्रमाणे त्यांनी हेल्मेट घातलेले नव्हते व ते दारूच्या नशेत होते, त्यामुळे सदर अपघात त्यांच्याही चुकीमुळे झालेला आहे. सदरचा अपघात ट्रक चालकाच्या चुकीमुळे झाल्याचे काही प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांनी मान्य केले आहे. त्यामुळे सदरचा अपघात मोटरसायकल चालक आणि ट्रक चालक यांच्या दोघांच्याही चुकीमुळे झालेला असल्याने सामनेवाला नुकसान भरपाई देण्यास जबाबदार नाही. सामनेवाला क्र. २ यांनी मयत अमोल यांचे वय उत्पन्न त्यांच्यावरील अर्जदारांचे अवलंबित्व इत्यादी सर्व बाबी नाकारल्या आहेत आणि अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

७) उपरोक्त परिस्थितीत निशाणी क्र. १३ वर खालील प्रमाणे मुद्दे काढण्यात आले असून त्याखाली नमूद कारणांसाठी त्यावर निष्कर्ष नोंदवण्यात येतात ते येणेप्रमाणे –

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | मोटार वाहन क्र. एमएच ४० – एन ९६४७ हे वाहन गुंतलेल्या अपघातात मयत अमोल प्रकाश बोंडे, राहणार विटाळी (धा), तालुका नांदुरा जिल्हा बुलढाणा यांचा मृत्यू झाला, हे अर्जदारांनी सिद्ध केले का? | … सकारात्मक. |
| २. | सदरचा अपघात मोटार वाहन क्र. एमएच ४० – एन ९६४७ च्या चालकाने भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने वाहन चालवल्यामुळे घडला, असे अर्जदाराने सिद्ध केले का? | … सकारात्मक. |

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ३. | विमा पॉलिसीच्या अटी शर्तींचा भंग झाला आहे असे विमा कंपनीने सिद्ध केले का? | ... सदर मुद्दा उपस्थित होत नाही. |
| ४. | अर्जदार नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहेत का? असल्यास किती आणि नुकसान भरपाई देण्यास कोण जबाबदार आहे? | होय, सामनेवाला क्र. २, रक्कम रुपये २०,२३,४००/-. |
| ५. | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणेमीमांसा

८) अर्जाच्या पृष्ठ्यर्थ अर्जदारांनी अर्जदार क्र. १ अनुराधा अमोल बोंडे यांची निशाणी क्र. १७ आणि कादरी ख्वाजा वाजिद मुल्ला मोईनऊल्ला यांची साक्ष निशाणी क्र. ३१ वर साक्ष घेतली असून निशाणी क्र. १८ ते ३०, ३४ ते ३७, ४४ वर कागदपत्र दाखल केली आहेत. अर्जदारांनी त्यांना अधिकचा पुरावा देणे नसल्याची पुरसीस निशाणी क्र. ३८ वर दाखल केली आहे.

९) सामनेवाला क्र. १ यांच्याविरुद्ध प्रकरण एकतर्फा चालले आहे. मात्र त्यांची साक्ष सामनेवाला क्र. २ यांनी निशाणी क्र. ३९ वर घेतली आहे. अधिकचा पुरावा देणे नसल्याची पुरसीस सामनेवाला क्र. २ यांनी निशाणी क्र. ४५ वर दिली आहे.

१०) अर्जदारांचे विद्वान वकील श्री. के.व्ही. परमार आणि सामनेवाला क्र.२ यांचे विद्वान वकील श्री. एन.एच. पाचपोर यांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

**<u>मुद्दा क्र. १ व २ करिता :–</u>**

११) अर्जदारांच्याच प्रकरणाप्रमाणे अर्जदारांचे साक्षीदार क्र. १ अनुराधा अमोल बोंडे यांनी त्यांच्या निशाणी क्र. १७ वरील पुराव्यात असे नमूद केले आहे की, तारीख २७/०६/२०२२ रोजी मयत अमोल हा त्याची मोटरसायकल क्र. एमएच २८ – डब्ल्यू २९०८ ने नांदुरा येथून विटाळी येथे येत असताना रात्री ८:३० ते ९:०० वाजेच्या सुमारास नायगाव फाटा ते गुरुद्वाराच्या रस्त्यावर पोहोचला असता मलकापूरकडून येणारे एसटी बस क्र. एमएच ४० – एन ९६४७ चा चालक म्हणजेच सामनेवाला क्र. १ याने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे, रस्त्याच्या परिस्थितीचा विचार न करता चालवून मयत अमोल बोंडे यांचे मोटरसायकलला धडक दिली. त्यामुळे मयत अमोल हा गंभीर जखमी झाला. त्याला उपजिल्हा सामान्य रुग्णालय मलकापूर येथे भरती करण्यात आले, मात्र त्यास वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मृत घोषित केले. सदर अपघाताबाबत दिनेश तुकाराम बोंडे यांच्या फिर्यादीवरून पोलीस स्टेशन नांदुरा येथे सामनेवाला क्र. १ विरुद्ध भारतीय दंड संहिता कलम २७९, ३०४–अ आणि मोटार वाहन अधिनियम कलम १३४ नुसार अपराध क्र. ४०३/२०२२ दाखल करण्यात

आला. सामनेवाला क्र. २ सदर एसटी बसचे मालक असल्याने ते नुकसान भरपाई देण्यास जबाबदार आहेत, याप्रमाणे अर्जदाराचा पुरावा आहे.

१२) याउलट सामनेवाला क्र. २ यांचे साक्षीदार क्र. १ श्री. जितेंद्र सुरेश पाटील म्हणजेच सामनेवाला क्र. १ यांचे निशाणी क्र. ३९ वरील पुराव्यानुसार असे म्हणणे आहे की, तारीख २७/०६/२०२२ रोजी ते उपरोक्त बस ठाणे ते शेगाव घेऊन जात असताना रात्री ८:३० ते ९:०० वाजता वडनेर भोलजी गावाच्या पुढे एका मोटर सायकलला एका ट्रकने धडक दिल्याने ती मोटरसायकल सदर एसटी बसकडे घसरत आली. त्यावेळी त्यांनी बस थांबून खाली उतरून पाहिले असता तेथे कोणीही व्यक्ती त्यांना दिसले नाही, म्हणून ते एसटी बसला घेऊन पुढील प्रवासासाठी निघून गेले. त्यांचे असे म्हणणे आहे की, सदर अपघात त्यांच्या चुकीमुळे झालेला नसून ती मोटरसायकल केवळ घसरत येऊन एसटी बसला धडकली होती, असाही त्यांचा पुरावा आहे. त्यांनी याप्रमाणेच सामनेवाला क्र. २ यांना त्यांचा जबाब दिला होता, असेही त्यांनी पुराव्यात नमूद केले आहे.

१३) वरील प्रमाणे उभयपक्षांचा एकमेकांविरुद्ध पुरावा आहे. अर्जदार यांचे साक्षीदार क्र. १ अनुराधा यांनी अपघात पाहिला नसल्याचे आपल्या उलटतपासणीत कबूल केले आहे, याउलट सामनेवाला क्र. २ चे साक्षीदार क्र. १ जितेंद्र हे अपघाताचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असल्याने त्यांचा पुरावा ग्राह्य धरण्यात यावा आणि त्या आधारे सदरचा अपघात एसटी बसच्या चालकामुळे घडलेला

नाही, हे सिद्ध होते, असा युक्तिवाद सामनेवाला क्र. २ चे विद्वान वकिलांनी केला. सदरचा युक्तिवाद वरवर पाहता संयुक्तिक वाटत असला तरी सामनेवाला क्र. २ च्या साक्षीदार क्र. १ जितेंद्र यांनी उलटतपासणीत दिलेल्या कबुली संदर्भात प्रथम विचार करणे आवश्यक आहे. त्यांनी आपल्या उलटतपासणी हे मान्य केले आहे की, सदर अपघाताबाबत महामंडळाने त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी केली होती आणि चौकशी पूर्ण झाल्यानंतर महामंडळाने त्यांची एक वेतन वाढ कमी केली होती. या कबुलीचा विचार केला असता सामनेवाला क्र. २ महामंडळ यांच्याच सदरच्या कृती प्रमाणे सदर अपघात सामनेवाला क्र. १ यांच्या चुकीमुळे घडल्याचा निर्णय त्यांनी विभागीय चौकशीत दिलेला असल्याचे दिसून येते. एवढेच नाही तर त्या चुकीची शिक्षा म्हणून सामनेवाला क्र. १ यांची एक वेतन वाढ सुद्धा थांबवली आहे. यावरून सदर अपघात सामनेवाला क्र. १ यांच्या चुकीमुळे झाल्याचे सिद्ध होत आहे.

१४) सदर अपघाताबाबत पोलीस स्टेशन, नांदुरा येथे भारतीय दंड संहिता कलम २७९, ३०४–अ आणि मोटर वाहन अधिनियम कलम १३९ अन्वये गुन्हा क्र. ४०३/२२ दाखल झालेला आहे. मात्र त्यात सामनेवाला क्र. १ आणि एसटी बस यांचा उल्लेख नाही. अज्ञात वाहनाने धडक दिल्याचे त्यात नमूद आहे. दोषारोपपत्रासोबत साक्षीदारांचे पोलीस जबाब दाखल करण्यात आले आहेत, त्यात सुद्धा एसटी बसचा क्रमांक नाही. या बाबींचा संदर्भ देत सामनेवाला क्र. २ यांचे विद्वान वकील श्री. पाचपोर यांनी असा युक्तिवाद केला की, मयत अमोल यांचे नातेवाईक यांनी पोलिसांशी संगनमत करून खोटेपणाने एसटी बसचा

उल्लेख दोषारोप पत्रात केलेला आहे व विनाकारण सामनेवाला क्र. १ यास आरोपी केलेले आहे.

**१५)** सदर युक्तीवादाचा विचार करण्यासाठी दोषारोप पत्र आणि त्यासोबत दाखल साक्षीदारांचे पोलीस जबाब यांचे अवलोकन केले. साक्षीदारांच्या पोलीस जबाबात प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनाचा उल्लेख आहे. त्याचप्रमाणे सदरचे वाहन एसटी महामंडळाची गाडी असावी, असा सुद्धा साक्षीदारांच्या पोलीस जबाबात उल्लेख आहे. प्रथम खबर यात मोटरसायकलला एका वाहनाचे ऑरेंज रंगाचे बफर अटकलेले असल्याचे नमूद आहे. असा उल्लेख घटनास्थळ पंचनाम्यात सुद्धा करण्यात आलेला आहे. एसटी बसच्या यांत्रिकी निरीक्षण अहवालात एसटी बसचे पुढील उजवीकडील बंपर तुटलेले आहे, त्याचप्रमाणे पुढील उजवीकडे हेडलाईट आणि इंडिकेटर फुटलेले आहेत, असा उल्लेख आहे. या सर्व बाबींचा विचार करता एसटी बसला विनाकारण या प्रकरणी गुंतवले असल्याचा सामनेवाल्यांचा युक्तिवाद योग्य दिसून येत नाही. त्याचप्रमाणे सामनेवाला क्र. २ चे साक्षीदार श्री. जितेंद्र पाटील यांनी त्यांच्या उलट तपासणीत दिलेल्या कबुलीच्या अनुषंगाने अर्जदारांनी दिलेला पुरावा अधिक संभवनीय असल्याचे दिसून येते.

**१६)** मयत अमोल हे दारू पिऊन मोटरसायकल चालवत होते, त्याचप्रमाणे निष्काळजीपणे, भरधाव वेगाने आणि रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून मोटरसायकल चालवत होते व त्यांनी हेल्मेट घातलेले नव्हते, त्यामुळे सदर अपघातास मयत अमोल सुद्धा जबाबदार ठरतात, असा युक्तिवाद सामनेवाला

यांच्यातर्फे करण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र मयत अमोल हे दारू पिलेले होते व ते निष्काळजीपणे भरधाव वेगाने आणि रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष हेल्मेट न घालता करून मोटरसायकल चालवत होते, याबाबत अभिलेखावर कोणताही संभवनीय पुरावा नाही. मयत अमोल यांनी हेल्मेट घातले नव्हते, असे गृहीत धरले, तरी केवळ त्या कारणाने ते निष्काळजीपणे व भरधाव वेगाने किंवा रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून मोटरसायकल चालवत होते, असे म्हणता येणार नाही.

१७) उपरोक्त चर्चेच्या अनुषंगाने अर्जदारांच्या तोंडीपुराव्यास सदरचे दोषारोपपत्र आणि सामनेवाला क्र. १ यांनी दिलेली कबुली पुष्टी देत असल्याने सदरचा अपघात एसटी बसचे चालक म्हणजेच सामनेवाला क्र. १ यांच्या चुकीमुळे झाल्याचे आणि सदर अपघातात मयत अमोल यांचा मृत्यू झाल्याचे सिद्ध होते म्हणून मुद्दा क्र. १ आणि २ वर मी सकारकात्मक निष्कर्ष नोंदवीत आहे.

<u>मुद्दा क्र. ३ करिता :–</u>

१८) सदर अपघात एसटी बसच्या चालकाच्या चुकीमुळे घडला असल्याचे सिद्ध झाले आहे. सदर एसटी बसची विमा पॉलिसी होती, असे सामनेवाल्यांचे म्हणणे नाही. त्याचप्रमाणे अशा काही विमा पॉलिसीच्या अटी–शर्तींचा भंग झाला आहे, असाही त्यांचा बचाव नाही. त्यामुळे विमा पॉलिसीच्या अटी–शर्तींचा भंग झालेला आहे किंवा नाही, हा प्रश्नच याकामी उद्भवत नाही.

सदरचा मुद्दा माझे पूर्व पीठासीन अधिकाऱ्यांनी अनावधानाने काढल्याचे दिसून येते. म्हणून या मुद्द्यावर “सदरचा मुद्दा उपस्थित होत नाही” असा निष्कर्ष नोंदविण्यात येतो.

**<u>मुद्दा क्र. ४ ते ५ :-</u>**

**१९)** मृतक अमोल यांचा सामनेवाला क्र. २ यांचे मालकीची एसटी बस गुंतलेल्या अपघातात मृत्यू झाल्याचे व सदर अपघात एसटी बस चालकाच्या चुकीमुळे घडल्याचे सिद्ध झाले आहे. त्यामुळे या प्रकरणी नुकसान भरपाई किती मिळू शकते, हे ठरवणे आवश्यक आहे. प्रथमतः मृतक अमोल यांच्या मृत्यूमुळे त्यांच्या उत्पन्नातील नुकसानी ठरवण्यासाठी त्यांचे उत्पन्न, वय, त्यांची वैवाहिक स्थिती, त्यांच्या उत्पन्नातील भविष्यातील वाढ, त्यांच्यावर अवलंबतांची संख्या इत्यादी बाबी पाहणे आवश्यक आहे.

**२०)** प्रथमतः मृतक अमोल यांच्या उत्पन्नाबाबत पुरावा पाहणे योग्य ठरेल. मयत अमोल हा रस्ता कंत्राटदार म्हणून काम करीत होता व त्यापासून दरमहा रुपये पंचेचाळीस हजार उत्पन्न होते, असे अर्जदारांचे म्हणणे आहे. अर्जदारांचे साक्षीदार क्र. १ यांनी त्यांच्या पुराव्यात सदर बाब नमूद केली आहे. त्याचप्रमाणे अर्जदारांच्या साक्षीदार क्र. २ कादरी ख्वाजा वाजीदउल्ला मोईनउल्ला (निशाणी क्र. ३१) यांनी सुद्धा सदर बाब त्यांच्या पुराव्यात नमूद केली आहे. सदर साक्षीदार स्थापत्य अभियंता असून त्यांनी इंजिनिअरिंगचे शिक्षण सन

१९९७ मध्ये पूर्ण झाले असून तेव्हापासून ते शासकीय कंत्राटदार म्हणून शासनाच्या विविध खात्यातील कामे मलकापूर शहर व ग्रामीण भागात करत असतात, असे सदर साक्षीदारांचे म्हणणे आहे. त्याचप्रमाणे त्यांना मिळालेल्या कंत्राटात उपकंत्राट ते मयत अमोल यांना देत होते आणि मयत अमोल यांनी सन २०१८ ते २०२२ पर्यंत बरीचशी उपकंत्राटाची कामे केलेली आहेत, सदर कालावधीत खर्च वजा जाता रक्कम रुपये ५०,०००/– ते ५५,०००/– इतके उत्पन्न मयत अमोल कमवत होते, असेही सदर साक्षीदाराने आपल्या पुराव्यात नमूद केले आहे.

२१) अर्जदारांचे साक्षीदार क्र. २ कादरी ख्वाजा हे शासकीय कंत्राटदार असतानाही त्यांनी मयत अमोल यांना अदा केलेल्या रकमेबाबत कोणतेही कागदपत्र अभिलेखावर दाखल केले नाही. त्याचप्रमाणे मयत अमोल यांच्याकडून त्यांना जी रक्कम अदा केली त्या रकमेबाबत केव्हाच पोहोच घेतले नाही, असेही सदर साक्षीदाराने मान्य केले आहे. मयत अमोल यांना दिलेल्या रकमेचा उल्लेख आयकर विवरणपत्रात केल्याचे सदर साक्षीदाराचे म्हणणे आहे. मात्र सदर विवरण पत्र दाखल करण्याचे मान्य करूनही सदर साक्षीदाराने सदर विवरणपत्र न्यायालयात दाखल केलेले नाही. त्याचप्रमाणे उपकंत्राटदार म्हणून मयत अमोल सदर साक्षीदाराकडे काम करीत असल्याबद्दल सुद्धा सदर साक्षीदाराने कोणतेही कागदपत्र दाखल केले नाही. मयत अमोल यास उपकंत्राट घेण्याची पात्रता किंवा अनुभव होता याबाबत सुद्धा अभिलेखावर कोणतेही कागदपत्र दाखल केलेले नाहीत. साक्षीदाराने केवळ त्यांच्या सहीचे प्रमाणपत्र दाखल केले आहे. या

परिस्थितीत मयत अमोल हे शासकीय उपकंत्राट घेऊन दरमहा रुपये ४५,०००/– ते ५५,०००/– उत्पन्न घेत होते हा अर्जदारांचा पुरावा संभवनीय वाटत नाही. त्यामुळे सदर बाब अर्जदार सिद्ध करू शकले नाहीत.

२२) मयत अमोल हे शेती सुद्धा करत होते आणि त्यापासून त्यांना वार्षिक दोन लाख रुपये उत्पन्न मिळत होते, असेही अर्जदारांचे म्हणणे आहे. सदर बाब अर्जदारांचे साक्षीदार क्र. १ अनुराधा यांनी त्यांच्या पुराव्यात नमूद केली आहे. मयत अमोल यांच्या मालकीची शेती होती, याबाबत कोणताही पुरावा अर्जदारांनी सादर केलेला नाही. या परिस्थितीत सदर पुराव्यावर विश्वास ठेवणे कठीण आहे. त्यामुळे शेतीपासून मयत अमोल यास उत्पन्न होते, ही बाब सुद्धा सिद्ध होत नाही.

२३) मयत अमोल यांचे लग्न झालेले होते, त्यांना अर्जदार क्र. २ ते ४ ही मुले आहेत आणि अर्जदार क्र. ५ व ६ हे म्हातारे आई–वडील आहेत. अर्जदारांच्या कुटुंबात इतर कुणी कमवत होते, असे सामन्यावाल्यांचे म्हणणे नाही. या परिस्थितीत कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी मयत अमोल हे काहीतरी काम करत असणार, हा अर्जदारांचा युक्तिवाद योग्य वाटतो. या परिस्थितीत मयत अमोल यांचे उत्पन्न हे नुकसान भरपाईसाठी काल्पनिक उत्पन्नाच्या संकल्पनेच्या आधारे ठरवणे आवश्यक आहे.

२४) अर्जदारांचे कुटुंब हे ग्रामीण भागात राहणारे आहेत. अपघात सन

२०२२ मध्ये झालेला आहे. मयत अमोल हा आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी शेतमजुरी करीत होता, असे गृहीत गृहीत धरले आणि शासनाने ठरवलेले शेतमजुरांसाठी किमान वेतनाचा विचार करता मयत अमोल हा दररोज रुपये ३००/— कमवत होता, असे ठरविल्यास ते योग्य व न्यायोचित होईल. या दराने त्याचे मासिक उत्पन्न रुपये ९०००/- होते आणि वार्षिक उत्पन्न रुपये १,०८,०००/- होते.

२५) मृत अमोल यांचे वय ३२ वर्ष असल्याचे अर्जदारांचे म्हणणे आहे. मयत अमोल यांचे वाहन चालवण्याच्या परवाना संदर्भात निशाणी क्र. २७ वर कागदपत्र दाखल केले आहे. त्यात त्यांची जन्मतारीख ०५/०३/१९९० असल्याचे नमूद आहे. अपघात सन २०२२ मध्ये झाला. म्हणजेच अपघाता वेळी मयत अमोल यांचे वय ३२ वर्षे होते, हे सिद्ध होते.

२६) नामदार सर्वोच्च न्यायालय यांचे **सरला वर्मा -विरुद्ध- दिल्ली ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन (२००९ एसीजे १२९८)** या निर्णयानुसार मोटार वाहन नुकसान भरपाई ठरवण्यासाठीचा मयत अमोल यांचे वय ३२ असल्याने गुणांक १६ येतो. या सर्व बाबींचा विचार करता मृतक अमोल यांच्या मृत्यूमुळे अर्जदारांच्या उत्पन्नाचे नुकसान झाल्याची भरपाई (वार्षिक उत्पन्नाचे नुकसान रक्कम रुपये १,०८,००० X १६ ) रक्कम रुपये १७,२८,०००/— येते.

२७) मयत अमोल हे मजुरी करत असल्याचे गृहीत धरले असल्याने

भविष्यात सुद्धा त्यांच्या मजुरीचे दर वाढले असते. त्यांचे वय ३२ होते हे लक्षात घेता स्थापित न्यायतत्वाच्या अनुषंगाने त्यांच्या मजुरीत/उत्पन्नात ४०% वाढ झाली असती, हे गृहीत धरणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांच्या वार्षिक उत्पन्नात ४०% वाढ गृहीत धरणे आवश्यक आहे. त्यानुसार त्यांच्या उत्पन्नात भविष्यातील वाढ म्हणून रक्कम रुपये ६,९१,२००/- मिळवणे आवश्यक आहे. सदरची रक्कम मिळवल्यानंतर त्यांचे एकूण वार्षिक उत्पन्न रक्कम रुपये २४,१९,२००/- होते.

२८) अर्जदार हे मृत अमोलची पत्नी, मुले व आई वडील आहेत, याबाबत वाद नाही. ते मृत अमोल यांच्यावर अवलंबून होते, असे अर्जदारांचे म्हणणे आहे. अर्जदार काही काम करतात, असे सामनेवालांचे म्हणणे नाही व तसाही पुरावा अभिलेखावर नाही. यास्तव सर्व अर्जदार मयत अमोल यांच्यावर अवलंबून होते हे सिद्ध होते. सर्व अर्जदारांची संख्या सहा आहे, अमोल यांच्यावर एकूण सहा व्यक्ती अवलंबित होत्या. मयत अमोल हे विवाहित होते. या सर्व बाबींचा विचार करता, नुकसान भरपाई ठरवितांना मयत अमोल यांच्या वैयक्तिक खर्चाची रक्कम म्हणून त्यांच्या उत्पन्नातून $^{१}/_{४}$ रक्कम वजा करणे आवश्यक आहे. सदरची रक्कम वजा करून मयत अमोल यांच्या मृत्यूमुळे त्यांच्या झालेल्या उत्पन्नाचे नुकसान भरपाई रक्कम रुपये १८,१४,४००/- येते.

२९) उपरोक्त नुकसान भरपाई व्यतिरिक्त मृतक अमोल यांच्या वाहन अपघातातील मृत्यूमुळे त्यांचे अवलंबित म्हणजे अर्जदारांच्या संपत्तीचे नुकसान (Loss of Estate ) आणि अंतिम संस्काराचा खर्च सुद्धा मिळण्यास अर्जदार पात्र

ठरतात. या सदरांखाली प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/– देण्यात यावे, हे स्थापित न्यायतत्त्व आहे. त्याचप्रमाणे नामदार सर्वोच्च न्यायालयाचे **नॅशनल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड –विरुद्ध– प्रणय सेठी, [२०१७ (१६) एसएससी ६८०]** या प्रकरणातील न्यायनिर्णयाप्रमाणे सन २०१७ पासून प्रत्येक तीन वर्षासाठी १० टक्के वाढ सदर रकमेत देण्यात यावी असे नमूद केले आहे. प्रस्तुत प्रकरणातील अपघात सन २०२२ मध्ये झालेला असल्याने सन २०१७ नंतर तीन वर्षापेक्षा जास्त, मात्र सहा वर्षापेक्षा कमी कालावधी गेलेला आहे. त्यामुळे अर्जदार सदर रकमेवर १०% वाढ मिळण्यास पात्र आहेत, म्हणजेच संपत्तीचे नुकसान आणि अंतिम संस्कार खर्च या प्रत्येक सदराखाली रुपये १६,५००/– मिळण्यास अर्जदार पात्र ठरतात.

३०) अर्जदार क्र. १ मृतक अमोल यांची पत्नी असून अर्जदार क्र. २ ते ४ ही अज्ञान मुले आहे. त्यामुळे अर्जदार क्र. १ यांचे पती आणि अर्जदार क्र. २ ते ४ यांचे पिता गमावल्याच्या वियोगामुळे स्थापित न्यायतत्त्वानुसार सदर अर्जदार प्रत्येकी रक्कम रुपये ४०,०००/– नुकसान भरपाई मिळण्यास पात्र ठरतात. त्याचप्रमाणे नामदार सर्वोच्च न्यायालयाचे **नॅशनल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड –विरुद्ध– प्रणय सेठी, [२०१७ (१६) एसएससी ६८०]** या प्रकरणातील न्यायनिर्णयाप्रमाणे सन २०१७ पासून प्रत्येक तीन वर्षासाठी १० टक्के वाढ सदर रकमेत देण्यात यावी असे नमूद केले आहे. प्रस्तुत प्रकरणातील अपघात सन २०२२ मध्ये झालेला असल्याने सन २०१७ नंतर तीन वर्षापेक्षा अधिक, मात्र सहा वर्षापेक्षा कमी कालावधी गेलेला आहे. त्यामुळे अर्जदार सदर रकमेवर १०%

वाढ मिळण्यास पात्र आहेत. त्यामुळे प्रत्येक अर्जदार रक्कम रुपये ४४,०००/- वियोगाची नुकसान भरपाई मिळण्यास पात्र ठरतात.

३१) मृत अमोल यांना अपघातानंतर दवाखान्यात दाखल केले होते, असे जरी अर्जदारांचे म्हणणे असले तरी त्यांच्यावर वैद्यकीय उपचार करण्यात आला होता, असे अर्जदारांचे म्हणणे नाही. त्यामुळे वैद्यकीय उपचाराचा खर्च मिळण्यास अर्जदार पात्र नाहीत.

३२) उपरोक्त नुकसान भरपाईच्या रकमेशिवाय अन्य सदराखाली अर्जदार नुकसान भरपाई मिळण्यास पात्र असल्याचे अर्जदारांचे म्हणणे नाही. उपरोक्त सदराखालील पात्र ठरलेली नुकसान भरपाईची रक्कम येणेप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | अपघातात मृत्यू झालेल्या अमोलच्या उत्पन्नाची नुकसान भरपाई | रु. | १८,१४,४००/- |
| ब. | संपत्तीचे नुकसान (Loss of estate) | रु. | १६,५००/- |
| क. | अंतिम संस्कार खर्च | रु. | १६,५००/- |
| ड. | अर्जदार क्र. १ चे पती आणि अर्जदार क्र. २ ते ४ यांचे पिता यांच्या मृत्यू वियोगामुळे नुकसान भरपाई रक्कम अर्जदार क्र. १ ते ४ प्रत्येकी रक्कम रुपये ४४,०००/- याप्रमाणे | रु. | १,७६,०००/- |
| | **एकूण नुकसान भरपाईची रक्कम (अ+ ब+ क+ ड)** | **रु.** | **२०,२३,४००/-** |

**सदस्य मो.अ. दावा न्या.**

३३) येणेप्रमाणे अर्जदार मोटार वाहन अपघात नुकसान भरपाई मिळण्यास पात्र ठरतात. सदर नुकसान भरपाईच्या रकमेवर अर्ज दाखल तारखेपासून रक्कम वसूल वसूल होईपावेतो बँक दराने व्याज देणे क्रमप्राप्त ठरते. सध्याचा बँक व्याजदराचा विचार करता वार्षिक ७% दराने व्याज देणे योग्य व वाजवी ठरेल.

३४) भविष्यातील उत्पन्न वाढीवर व्याज देता येणार नाही असे सामनेवाल्यांचे म्हणणे आहे, मात्र भविष्यातील उत्पन्न वाढ ही मानिव वाढ धरून नुकसान भरपाई ठरवण्यात येत असल्यामुळे सदरचा युक्तिवाद योग्य व संयुक्तिक नाही.

३५) अर्जदारांनी नुकसान भरपाईची रक्कम अधिक मागितली असली, तरी न्यायालयीन मुद्रांक मात्र रक्कम रुपये एक लाखावर दिलेला आहे. मात्र योग्य व वाजवी मोटर अपघात नुकसान भरपाई ठरवण्याची जबाबदारी मोटार अपघात नुकसान भरपाई न्यायाधिकरण यांच्यावर असल्याने उर्वरित न्यायालयीन मुद्रांक अर्जदारांनी सादर करण्याच्या निर्देशासह नुकसान भरपाई देण्याचा हुकूम करणे न्यायच्या दृष्टीने आवश्यक व गरजेचे आहे.

३६) अर्जदारांचे मृतक अमोल यांचेशी असलेले नाते, त्यांचे अवलंबित्व व त्यांचे वय लक्षात घेता अर्जदार क्र. १ ते ४ यांना नुकसान भरपाई पैकी प्रत्येकी २० टक्के रक्कम आणि इतर अर्जदारांना प्रत्येकी १०% रक्कम देणे न्यायच्या दृष्टीने

आवश्यक व गरजेचे आहे. अर्जदार क्र. २ ते ४ हे अज्ञान असल्याने त्यांच्या हिश्याची नुकसान भरपाईची रक्कम मुदत ठेवीत ठेवण्याचा आदेश करणे आवश्यक आहे.

३७) नामदार सर्वोच्च न्यायालय यांचे **सुमोटो रिट पिटिशन क्र. ७/२०२५ मधील तारीख २२/०४/२०२५** रोजीच्या आदेशानुसार नामदार उच्च न्यायालय, मुंबई यांनी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार अर्जदारांनी त्यांचे आधार कार्डची प्रत, पॅन कार्डबद्दल माहिती, ई–मेल आणि बँक खात्याचा तपशील या आदेशापासून पंधरा दिवसाच्या आत देण्याचा हुकूम करणे आवश्यक ठरते.

३८) मुद्दा क्र. १ व २ यांच्यावरील निष्कर्षाच्या अनुषंगाने सदरचा अपघात एसटी बस चालकाच्या भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून वाहन चालवण्यामुळे घडला असल्याचे सिद्ध झाले आहे. सदर वाहन सामनेवाला क्र. २ च्या मालकीचे आहे, याबाबत वाद नाही. त्यामुळे सामनेवाला क्र. २ या कामी नुकसान भरपाई देण्यास जबाबदार ठरतात.

३९) उपरोक्त चर्चेच्या अनुषंगाने प्रस्तुच्या मुद्द्यांवर निष्कर्ष नोंदवून खालील प्रमाणे आदेश करण्यात येतात –

## आदेश

१) मोटार अपघात नुकसान भरपाई अर्ज क्र. ५७/२०२२ खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२) सामनेवाला क्र. २ यांनी अर्जदारांना नादोष नुकसान भरपाईच्या रकमेसह मोटार अपघात नुकसान भरपाई रक्कम रुपये २०,२३,४००/– (अक्षरी रक्कम रुपये वीस लाख तेवीस हजार चारशे मात्र) अर्ज दाखल तारखेपासून संपूर्ण रक्कम वसूल होईपावेतो सदर रकमेवर दर साल दर शेकडा सात टक्के व्याजासह अदा करावी.

३) सामनेवाला क्र. २ यांनी नुकसान भरपाईची रक्कम या न्यायाधिकरणाच्या खालील बँक खात्यात जमा करावी व त्याबाबत खाली नमूद ई–मेलवर न्यायाधिकरणास कळवावे.

| | | |
|---|---|---|
| बँकेचे नाव | : | भारतीय स्टेट बँक. |
| शाखा | : | मलकापूर, जिल्हा बुलढाणा. |
| खाते क्रमांक | : | 40786745622. |
| आय.एफ.एस.सी. कोड | : | SBIN0000419. |
| ईमेल | : | mahbulmalsc@aij.gov.in |

४) नुकसान भरपाई रकमेपैकी प्रत्येकी २० टक्के रक्कम अर्जदार क्र. १ ते ४ यांना आणि प्रत्येकी १०% टक्के रक्कम इतर अर्जदारांना देण्यात यावी.

५) अर्जदार क्र. २ ते ४ यांच्या हिश्याची नुकसान भरपाईची रक्कम ते सज्ञान होईपावेतो राष्ट्रीयकृत बँकेत मुदत ठेवीत ठेवण्यात यावी.

६) अर्जदारांनी नियमाप्रमाणे उर्वरित मुद्रांक शुल्क १५ दिवसाच्या आत न्यायालयात सादर करावे.

७) नामदार सर्वोच्च न्यायालय यांचे **सुमोटो रिट पिटिशन क्र. ७/२०२५ मधील तारीख २२/०४/२०२५** च्या आदेशानुसार नामदार उच्च न्यायालय, मुंबई यांनी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार अर्जदारांनी त्यांचे आधार कार्डची प्रत, पॅन कार्ड बद्दल माहिती, ई-मेल आणि बँक खात्याचा तपशील या आदेशापासून पंधरा दिवसाच्या आत न्यायाधिकरणास आत करावा.

८) अर्जदारांनी उर्वरित मुद्रांक शुल्क सादर केल्यानंतर अवार्ड करण्यात यावा.

९) येणेप्रमाणे अर्ज निकाली केला असे.

Digitally signed by PURUSHOTTAM BHAURAO JADHAV
Date: 2026.04.01 17:06:36 +0530

मलकापूर.
दिनांक – ०१/०४/२०२६.

**(पुरुषोत्तम भा. जाधव)**
सदस्य,
मोटार अपघात दावा न्यायाधिकरण,
मलकापूर.

- - - - -

**प्रमाणपत्र**

मी प्रमाणित करते की, या न्यायनिर्णयाची अपलोड केलेली पी.डी.एफ. फाइल ही मूळ स्वाक्षरी केलेल्या न्यायनिर्णयानुसार खरी आणि बरोबर प्रत आहे.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नांव | :- | मोटार अपघात दावा न्यायाधिकारण, मलकापूर. |
| लघुलेखिकेचे नांव | :- | कु. एच.डी. चौधरी, लघुलेखक श्रेणी-१ |
| न्यायनिर्णय पारीत केल्याचा दिनांक | :- | ०१/०४/२०२६. |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दिनांक | :- | ०२/०४/२०२६. |